**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक**
**MAHARASHTRA UNIVERSITY OF HEALTH SCIENCES, NASHIK**
दिंडोरी रोड, म्हसरूळ, नाशिक – ४२२००४, Dindori Road, Mhasrul, Nashik - 422004
**EPABX:** 0253-2539100-300, **Phone:** 0253-2539173,174
**Website** : www.muhs.ac.in, **E-mail** :sw@muhs.ac.in

**संदिप श्रीराम कुलकर्णी**
(बी.एस.एल.,एलएल.बी.,एम.पी.ए.पी.,जी.डी.एच.आर)
**प्र.संचालक, विद्यार्थी कल्याण**

**Sandip Shriram Kulkarni**
(B.S.L., LLB., M.P.A., P.G.H.D.R.)
**Offg. Director, Student Welfare**

मआविवि/एस.डब्ल्यू/एनएसएस/९२५/२०२० दिनांक :-२४/०९/२०२०

प्रति,
मा. अधिष्ठाता / प्राचार्य,
विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये,
मआविवि, नाशिक.

विषय : "माझे कुटुंब माझी जबाबदारी" मोहिम राबविणेबाबत...
संदर्भ : रासेयो राज्य संपर्क अधिकारी/विशेष कार्य अधिकारी, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे दि.१७/०९/२०२० रोजीचे पत्र.

महोदय / महोदया,

महाराष्ट्र शासन, राष्ट्रीय सेवा योजना यांचेकडुन संदर्भीय पत्रान्वये "माझे कुटुंब, माझी जबाबदारी" ही मोहिम दि.१५/०९/२०२० ते २५/१०/२०२० या कालावधीत राबविणेबाबत सुचित करण्यात आले आहे.

या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की आपल्या महाविद्यालयातील सर्व रासेयो स्वयंसेवक विद्यार्थ्यांबरोबरच ईतर सर्व विद्यार्थ्यांना सदर मोहिमेमध्ये सहभागी होण्यासाठी आपल्या स्तरावरुन निदेर्शित करण्यात यावे.

"माझे कुटुंब, माझी जबाबदारी" या मोहिमेच्या अंमलबजावणीबाबत पुढील त्रिसुत्रीचा अवलंब करावा १) मास्क वापरणे २) हात स्वच्छ धुणे ३) शारीरिक अंतर राखणे. तसेच, शासनाने निर्देशित केलेल्या सदर मोहिमेबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणुन घरोघरी सर्वेक्षणामध्ये स्थानिक प्रशासनाच्या आवश्यकतेनुसार मोहिमेत सहभागी व्हावे. अधिक माहितीकरिता शासनाचे संदर्भीय पत्र आपल्या माहितीस्वत तथा कार्यवाहीस्तव सोबत जोडुन पाठवित आहोत. त्यानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. आपल्या महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या कुटुंबातील सर्व सदस्यांबाबतची माहिती विद्यापीठास अहवाल स्वरुपात सादर करण्यात यावी. अहवालाचा नमुना सोबत जोडलेला आहे. जेणेकरुन सदर अहवाल शासनास कळविणे शक्य होईल.

प्र.संचालक
विद्यार्थी कल्याण तथा
रासेयो कार्यक्रम समन्वयक

"माझे कुटुंब माझी जबाबदारी"

<u>मोहिमेचा अहवाल</u>

(सदर अहवाल संगणकीय एक्सेल शीट मध्ये नमुद करुन दिनांक ३०/१०/२०२० रोजीपावेतो सादर करावी)

| अ. क्र. | विद्यार्थ्याचे पुर्ण नाव | महाविद्यालयाचे नाव | विद्यार्थ्याच्या कुटुंब प्रमुखाचे /पालकाचे पुर्ण नाव | सदर मोहिमेत सहभागी विद्यार्थ्याच्या कुटुंबातील सदस्यांची संख्या | विद्यार्थ्याने सदर मोहिमेची माहिती दिलेल्या एकुण नागरिकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

# महाराष्ट्र शासन


उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,

एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई- ४०० ००१.

Email- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२- २२६७९५६५


---

क्र.- संकीर्ण-२०२०/प्र.क्र.९२/साशि-७ दिनांक- १७.०९.२०२०

प्रति,

मा. कुलगुरू / मा. संचालक

सर्व विद्यापीठे / संचालनालये

विषय- " माझे कुटुंब, माझी जबाबदारी मोहिम "
दि. १५.०९.२०२० ते २५.१०.२०२० या कालावधीत राबविणेबाबत.

संदर्भ- सार्वजनिक आरोग्य विभागाचे पत्र क्र. कोरोना-२०२०/प्र.क्र.३९१/
आरोग्य-५, दिनांक ११.०९.२०२०

मा. महोदय,

मा. मुख्यमंत्री महोदय (महाराष्ट्र शासन) यांचे सल्लागार डॉ. दिपक म्हैसेकर यांनी सूचित केल्यानुसार, प्रत्येक विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग, सांस्कृतीक विभाग, शारीरिक शिक्षण विभाग, आजीवन व निरंतन शिक्षण विभाग व विद्यार्थ्यांशी संबंधित इतर सर्व विभाग, या विभागांतील सर्व विद्यार्थ्यांना " माझे कुटुंब, माझी जबाबदारी" या मोहिमेमध्ये सहभागी होण्यासाठी निर्देशित केले आहे. सबब ही मोहिम राबविण्यासाठी कृपया आपण मा. कुलसचिव यांना निर्देशीत करून, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांना या मोहिमेमध्ये सहभागी होण्याचे निर्देश निर्गमीत करावेत.

"माझे कुटुंब, माझी जबाबदारी" या मोहिमेच्या अंमलबजावणीबाबतची मार्गदर्शक पुस्तिका सोबत जोडण्यात आली आहे.

या मोहिमेमध्ये पुढील त्रिसूत्रीचा अवलंब करावा- १) मास्क वापरणे २) हात स्वच्छ धुणे ३) शारीरिक अंतर राखणे. या त्रिसूत्रीद्वारे जनजागृती करण्याकरिता, शासनाने निर्देशित केलेल्या सदर मोहिमेबाबतच्या उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी स्वयंसेवक म्हणून घरोघरी सर्वेक्षणामध्ये सहभागी व्हावे, अशा प्रकारचे निर्देश देण्यात यावेत.

मी आपणांस विनंती करीतो की, आपल्या अधिनस्त महाविद्यालयांच्या उपरोक्त विद्यार्थी संबंधित सर्व विभागांकडून, महाविद्यालयीन प्रत्येक विद्यार्थ्याची व त्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची एकत्रित माहिती विद्यापीठांच्या वेबसाईट पोर्टल वर अपलोड केली जाईल, असे पहावे.

तसेच जेव्हा मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडून अंमलबजावणीबाबतची विचारणा केली जाईल, तेव्हा सदर विद्यापीठांनी अपलोड केलेली संकलित माहिती ( प्रत्येक विद्यापीठ इतक्या कुटुंबांपर्यंत पोचले आहे ) मा. मुख्यमंत्री कार्यालयाकडे सादर करण्यात येईल, असे पहावे.

कृपया आपल्या स्तरावर या विभागांच्या मदतीने मोहिमेचे सर्वेक्षण करण्यात यावे. या सर्वेक्षणातून आपल्या अधिनस्त महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थी व त्या विद्यार्थ्याचे कुटुंब सुरक्षित आहे, याचे सर्वेक्षण करण्यात यावे. जर सुरक्षित नसतील, तर त्याबाबतीत आजारी व्यक्ती व त्यांचे विलगीकरण कसे केले आहे, याची माहिती संकलित करण्यात यावी. कुटुंबाला सजग करण्यासाठी ईमेल, व्हॉटसॲप, सोशल मेडियाद्वारे जनजागृती मोहिम राबविण्यात यावी.

आपला,

डॉ. अतुल हं. साळुंके
(राज्य संपर्क अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी)
महाराष्ट्र शासन

सोबत- १. संदर्भीय पत्राची प्रत
२. "माझे कुटुंब, माझी जबाबदारी" या मोहिमेच्या अंमलबजावणीबाबतची मार्गदर्शक पुस्तिका.

**प्रत पुढील कार्यवाहीसाठी-**

१. कुलसचिव
२. कार्यक्रम समन्वयक तथा संचालक, राष्ट्रीय सेवा योजना
३. संचालक, विद्यार्थी विकास,
४. संचालक, शारीरिक शिक्षण विभाग,
५. संचालक, आजीवन आणि निरंतन शिक्षण विभाग